**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४४७/२०२६</u>**
CNR No. MHDH070011502026
**( देवा बाबू भिल व इतर**
**विरुध्द**
**कोणीही नाही.)**

## <u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>
## <u>(पारित दिनांक १६ जुलै, २०२६)</u>

१. अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ (थोडक्यात 'सदर कायदा' असे संबोधले आहे) चे नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. दाखल कागदपत्रे व अभिलेख तपासले, अर्जदारांतर्फे वकील श्री. पी. वाय. राजपूत यांचा युक्तीवाद ऐकला. कोणीही हजर होऊन प्रस्तुत अर्ज आव्हानीत केला नाही.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, मयत नबाबाई बाबू भिल हया अर्जदार क्र. १ ते ३ च्या आई होत्या व त्यांचे दिनांक १९.११.२०२४ रोजी मौजे पिंप्री, ता. शिरपूर, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. मयत नबाबाई बाबू भिल यांचे पती बाबू आना भिल यांचे देखील दि. २८.१०.२००७ रोजी निधन झालेले आहे. अर्जदार हेच मयत नबाबाई बाबू भिल यांचे कायदेशीर वारस आहेत, याशिवाय मयतास कुणीही वारस नाहीत. अर्जदार यांना मयत नबाबाई बाबू भिल यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामाकरिता आवश्यकता आहे त्यामूळे प्रस्तूतचा अर्ज केला असून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास हरकत मागविण्याकरिता दि. १५.०६.२०२६ रोजी 'आपला महाराष्ट्र' या वृत्तपत्रात जाहीर नोटीस निशाणी क्र. ११ व ग्रामपंचायत पिंप्री येथे निशाणी ०७ अन्वये जाहीरनामा प्रसिध्द केला. त्याप्रमाणे योग्यरित्या बजावणी होऊन देखील अर्जदार हे मयताचे वारस आहेत व त्यांची मागणी इत्यादी विरुध्द कोणीही व्यक्तीशः अथवा वकीलांमार्फत उपस्थित होऊन हरकत घेतली नाही.

४. अर्जदारांनी अर्जाच्या पुष्टयार्थ अर्जदार क्र. १ चे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १० वर दाखल केले आहे. मयत नबाबाई बाबू भिल, बाबू आना भिल यांच्या मृत्यू दाखल्याच्या पडताळीत प्रती निशाणी क्र. १२ व १३ वर व अर्जदारांच्या

आधारकार्डाच्या पडताळीत प्रती निशाणी क्र. १४ ते १६ वर दाखल केलेल्या आहेत. अर्जदारांतर्फे विधिज्ञांनी निशाणी क्र. १७ वर पुरावा बंद पुरसिस दाखल केलेली आहे.

५. अर्जदारांतर्फे देण्यात आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकांस पुरक असुन तो अबाधित आहे. सबब, अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे व प्रतिज्ञापत्रांच्या आधारे अर्जदार हे मयत नबाबाई बाबू भिल यांचे कायदेशिर वारस आहेत असे ठरविणे न्यायोचित होईल. करिता सदरचे वारस प्रमाणपत्र अर्जदाराच्या कथनांच्या आधारे देण्यात येत असून त्यातील मजकुर खोटा आढळल्यास अर्जदार हे स्वतः जबाबदार राहतील. परिणामतः हा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील अंतीम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ देवा बाबू भिल, क्र. २ भिवा बाबू भिल व क्र. ३ लताबाई आप्पा भिल यांच्या नांवे मागणी केल्याप्रमाणे ते मयत नबाबाई बाबू भिल यांचे कायदेशीर वारस असल्याचा औपचारीक वारस दाखला अर्जदारांच्या नावे देण्यात येत आहे.

३. अर्जदारांनी योग्य तो मुल्याचा मुद्रांक दिल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. अर्ज वरीलप्रमाणे निकाली काढण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला).

SNEHAL RAVINDRA PATIL

Digitally signed by SNEHAL RAVINDRA PATIL
Date: 2026.07.16 17:27:01 +0530

शिरपूर,
दि. १६.०७.२०२६.

(श्रीमती स्नेहल आर. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरपूर,
जि. धुळे.

**<u>Certificate</u>**

*I affirm that the contents of this PDF file Order are same word to word as per the original Order.*

| | |
|---|---|
| *Name of the Stenographer* | *Gopal A. Patil* |
| *Name of the Court* | *Smt. Snehal R. Patil, J.M.F.C., Shirpur, Dist. Dhule.* |
| *Date of dictation* | *16.07.2026.* |
| *Order Signed by P.O. on* | *16.07.2026.* |
| *Order Uploaded on* | *16.07.2026.* |